॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Phone : (02462) 229242
Fax : (02462) 215572

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

Website : srtmun.ac.in
E-mail : approvalsrtmun@gmail.com


Ref. No. Acad/02/2023-2024/459.

Date : September 05, 2023

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित,
अशासकीय अनुदानीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड.

विषय:— विद्यापीठ अनुदान आयोग विनिमयानुसार सर्व शिक्षकांचे सेवा अंतर्गत प्रगती योजने नुसार स्थान निश्चितीबाबत...

संदर्भ:— १) यु.जी.सी. रेग्युलेशन २०१८.
२) शासन निर्णय ०८ मार्च २०१९ व शुध्दीपत्रक १० मे २०१९.
३) मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण, पुणे यांचे दि.०८ जुलै २०१९ रोजीचे आदेश.
४) विद्यापीठाचे परिपत्रक दि. ०८/०८/२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून मा. प्र—कुलगुरू महोदयांचे आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनिमय २०१८ महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. २ अन्वये लागु केलेले आहेत. सदर शासन निर्णयानुसार शिक्षकांच्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदावर स्थान निश्चिती लाभ लागु करण्याचा दिनांक हा त्यांची मुलाखत संपन्न झालेला दिनांक असल्याचे नमूद केले आहे.

संदर्भ क्र. ३ अन्वये प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदासाठी पात्र असणा—या शिक्षकांच्या स्थान निश्चितीची कार्यवाही वेळेत होणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. तसेच कार्यवाही पूर्ण करणा—याची जवाबदारी संबंधीत संस्था/महाविद्यालयाची राहील असे नमुद केले आहे. सदर बाब या पुर्वीही अशासकीय अनुदानीत महाविद्यालयांच्या निर्दशनास आणुन दिली आहे. असे असतानाही वेळेवर स्थान निश्चिती होत नसल्याबाबत शिक्षकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

काही प्रकरणात स्थान निश्चिती करीता समीतीची मागणी करण्याकरिता विलंब केला जात आहे, तर काही प्रकरणात समिती देऊनही कार्यवाही करत नसल्याचे निर्दशनास येत आहे. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने असे निर्दशणास आले आहे की, सदर बाब गंभीर असुन आपणास पुनश्च या पत्राव्दारे कळविण्यात येते की पात्र असलेल्या शिक्षकांना प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक पदावर स्थान निश्चीतीची कार्यवाही विहीत कालावधीत करणे बंधनकारक आहे. अशी कार्यवाही न केल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी संबंधीत संस्था/प्राचार्य यांची राहील, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहितीस्तव: १) मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र—कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) सिस्टीम एक्सपर्ट यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.